MHKO070011522017

<u>रेग्युलर कज्जा नं. १८५/२०१७ मधील नि.क्र. १९ वरील आदेश.</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रं.१ व २ तर्फे दाखल करणेत आलेला असून त्याव्दारे त्यांचे विरुध्द झालेला " विना कैफियत" चा आदेश रद्द होवून प्रस्तुत प्रतिवादी नं.१ व २ यांची कैफियत कामात सामील करुन घेणेची मागणी केलेली आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादी क्रं.१ व २ चे म्हणण्याप्रमाणे या कामातील आवश्यक ती कागदपत्रे त्यांना वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना दावेकामी कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत देणेस जाणूनबुजून विलंब अथवा टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तुत प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित व पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट कैफियत दाखल करुन घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, योग्य ते न्यायाचे हुकूम करण्यात यावे. मे. कोर्टानी सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादीला प्रतिवादीकडून रक्कम रु.५००/- कॉस्ट बसविणेत यावी ही विनंती.

४. उभय पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द करारपत्रावरुन खरेदीपत्र पुरे होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्रं.१ व २ हे दि.२९/१/२०१८ रोजी स्वतःहून विधिज्ञामार्फत हजर होवून प्रस्तुत दाव्यास कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुतचा अर्जासोबत त्यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी त्यांना दाव्याकामी आवश्यक माहिती व कागदपत्राची जुळवाजुळव मुदतीत करता आली नसल्यामुळे त्यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे कथन केलेले आहे. कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी क्रं.१ व २ यांना जवळपास पाच महिन्याचा विलंब झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एकंदरित कागदपत्रावरुन प्रतिवादीस कैफियत

दाखल करण्यास झालेल्या विलंब हा जरी संयुक्तीक वाटत असला तरी झालेल्या विलंबामुळे विरुध्द पक्षकारांची गैरसोय झालेली आहे. परंतु प्रतिवादी पक्षास म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास नैसर्गिक न्यायतत्वाने प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले असतात. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींना झालेली गैरसोय ही खर्चाच्या माध्यमातून भरुन काढता येण्यासारखी आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादींना र.₹५००/- अर्जाचा खर्च म्हणुन देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. खर्चाची रक्कम अदा केलेनंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

सही/-
(व्ही.पी.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर

दिनांक – ११.०७.२०१९